ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

REVIEW OF RESEARCH

# मराठाकालीन रामोशी समूहाच्या योगदानाचा समाजशास्त्रीय अभ्यास




प्रा. डॉ. संजीव सुकदेव पगारे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय,
मोराणे, ता. जि. धुळे.

## प्रास्ताविक :

या देशातील अनेक मूळ निवासी जमातींपैकी आदिवासी ही प्रमुख जमात होय. आर्यांच्या आगमनापूर्वीपासून अशा अनेक जाती–जमाती या देशात शांततामय जीवन जगत होत्या. म्हणूनच आक्रमक आर्यांपुढे त्यांचा पराभव होऊन त्यांना आर्यांच्या स्वामित्वात वाटचाल करावी लागली. झालेल्या उत्खननानुसार ह्या जमाती द्रविडियन वंशीय जमाती म्हणून ओळखल्या गेल्यात. या द्रविडीयन नंतर येणाऱ्या आर्य यांच्याही पूर्वीपासून या देशात डोंगर–दऱ्यांमधे काही जमातींचे वास्तव्य होते. त्यांनाच वन्य जमाती म्हणजेच आदिवासी जमाती असे म्हटले गेले. प्राचीन काळात या देशात प्रोटो ऑस्ट्रलाइड व निग्रिही तसेच मंगोलाईड या वेगवेगळ्या मानवी वशांपासून या वन्यजमातींची म्हणजेच आदिवासी या जमातींची उत्पत्ती झाली असल्याचे आता सर्वमान्य झाले आहे. म्हणजेच आपल्या देशात आद्य रहिवासी आदिवासी हेच होत. या जमातीतील लोकांचे साधर्म्य हे दस्यू ह्या लोकांशी सांगितले जाते. आदि वास करणारे ते आदिवासी हा समर्पक अर्थ याच्यातून आपल्याला काढता येतो. हिमालय पर्वतरांगांच्या परिसरात याच लोकांची गणराज्य अस्तित्वात होती. सर्वसाधारण आणि शांतताप्रिय सांस्कृतिक मूल्यांची राखण करीत वाटचाल करणाऱ्या या लोकांवर कुटिल मार्गाचा अवलंब करून आर्यांनी विजय मिळविला. अश्याच स्वाभिमानी आणि स्वयंभू जमातीमध्ये महाराष्ट्रातील रामोशी या जमातीचा समावेश होतो.

## 'रामोशी' समूहवाचक शब्दाची उत्पत्ती :

महाराष्ट्रातील एक विमुक्त जमात म्हणून रामोशी म्हणून रामोशी जमातीचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्रात पुणे, सोलापूर, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यात रामोशी जमातीची बहुसंख्य वस्ती आढळून येते. स्वातंत्र्योत्तर काळात रामोशी ह्या समूहाचा समावेशक विमुक्त जातीसमूहात करण्यात आला. हा समाज मूळचा उत्तर प्रदेशातील आयोध्या येथील असून पुढे कर्नाटकात स्थिरस्थावर होऊन नंतर महाराष्ट्रात आला. आपल्या नित्य व्यवहारात कानडी व मल्याळी यांच्यातील मिश्र भाषेचा वापर करीत असला तरी आपल्या व्यवसायात सांकेतिक भाषेचा वापर रामोशी लोक करीत. कानडी बेरडांची एक शाखा असलेले रामोशी लोक स्वतःला 'रामवंशी' असल्याचे मानतात.[1] तसेच रानात राहणारे ते रानवासी म्हणजेच रामोशी असेही वाचावयास मिळते. या समूहगटाला प्राचीन थोर इतिहासाची परंपरा लाभली असल्याचे सांगितले जाते. ते आधीपासूनच शूर–पराक्रमी, तेवढेच प्रामाणिक आहेत. रानावनात राहून कंदमुळेसारखे अन्नपदार्थ आणि शिकार करून मिळविलेले मांस यावर त्यांचा चरितार्थ भागविला जाई. रामाच्या वनवासकाळात त्यांनी रामाच्या सुरक्षेचे काम मोठ्या निष्ठेने पार पाडले म्हणून त्यांची ओळख रामभक्त म्हणून पुढील काळात राहिली आहे. त्यांच्या क्षत्रियत्वाच्या गुण धारणेतूनच त्यांना राजाश्रय लाभत गेल्याने हे लोक स्वतःला क्षत्रिय रामोशी म्हणवून घेतात. प्रारंभी हे लोक आपली ओळख 'रामवंशी' अशी करून देत असल्याने पुढील काळात या शब्दाचा अप्ंश 'रामोशी' असा झाला.[2] असे असले तरी बहुसंख्य

संशोधक आणि लेखक 'रानवासी' म्हणजे रानात राहणारे म्हणून रामोशी हीच व्युत्पत्ति असल्याचे मानतात.

## रामोशी समूहातील जाती–पोटजाती :

कोळी रामोशी, व्हलगे रामोशी, मांग रामोशी, भिल्ल रामोशी अशा चार पोटजाती रामोशी समूहांमध्ये असल्याचे सांगितले जाते. पश्चिम महाराष्ट्रात कोळी रामोशी सोलापूर जिल्हा भागात व्हलगे रामोशी, पश्चिम महाराष्ट्रात भिल्ल रामोशी तर मांग रामोशींच्या वस्त्या पश्चिम महाराष्ट्राबरोबरच मराठवाडा व विदर्भात आढळून येतात. कोळी आणि भिल्ल रामोशी समूहांना मात्र त्यांच्या वस्तीस्थानानुसार असलेल्या प्रदेशात आदिवासी म्हणून ओळखले जाते.[3] पुरंदर आणि होलगा रामोशी या रामोशी समूहातील पोटजातीमध्ये लग्नसंबंध जोडले जात नाहीत. तसेच रामोशींमध्ये एक आडनाव आणि एकच कुलदैवत असलेल्या कुळांमध्ये लग्नसंबंध होत नसतात.[4] बेरड रामोशी समाज समूहामधीलच एक उपघटक मानला जातो. बेरडांमधील तेलगु जात समूहातील उत्तर भारतात राहणाऱ्या शाखेला रामोशी म्हटले जाते. बेळगाव जिल्ह्यात राहणारे रामोशी आजही स्वतःला बेरड असल्याचेच मानतात. असे असले तरी बेरड आणि रामोशी यांच्यात रोटी व्यवहार होत असला तरी बेटी व्यवहार मात्र होत नसल्याने बेरड हा रामोशी समूहातील एक पोटभेद असावा, असे मानले जाते. तरीही व्यवसायानुसार बेरड आणि रामोशी हे एकच असावेत असे निष्कर्षास येते. त्यांच्यात कुणबी व मांग रामोशींची भर पडली असावी.[5]

## रामोशी समूहातील कुळे :

कुळाचार वेगवेगळ्या स्वरूपात असलेल्या रामोशी जमातीत कुळांना महत्त्वाचे स्थान आहे. खोमणे, चव्हाण, भंडलकर, शेळके, बोढरे, जाधव, मदने, शितोळे, सितकल, गोफणे, माकर, गोरगल, लोडगे, मसुगडे, गावडे, पाटोळे, बुधावले इत्यादी कुळे रामोशी समूहांमध्ये आढळून येतात. हीच कुळे आडनावे म्हणून रामोशी लोक लावतात. घरातील कर्ती माणसे आपल्या मुला–मुलींची लग्ने जमवताना आडनाव, देवक आणि कुळे यांचा प्राधान्याने विचार करीत असतात. एकाच आडनावात लग्ने संबंध जुळविले जात नाहीत. रामोशी समाजात लग्नात मुलीच्या वडिलांना हुंडा द्यावा लागत नाही.[6] या समाजात चव्हाण आणि जाधव या दोन मूळ कूळ शाखा असून त्यांच्यातील वैवाहिक संबंधातून इतर अनेक कुळांचा उदय झाला आहे. ही कुळे सुद्धा आपल्या मूळ शाखांशी संबंध ठेवून आहेत. म्हणूनच मूळ शाखेतून उदयास आलेल्या कुळांमध्येसुद्धा वैवाहिक संबंध जुळविले जात नाहीत. म्हणजेच चव्हाण या मूळ शाखेतून उदयास आलेली कुळे आपसात लग्न न करता जाधव शाखेतील कुळांशी वैवाहिक संबंध ठेवतात. तसेच जाधव शाखेतील कुळे चव्हाण शाखेतील कुळांशी वैवाहिक संबंध ठेवत असतात. गावे आणि व्यवसायावरून पडलेली ही कुळे साधारणतः 125 पेक्षाही जास्त असल्याचे आढळते. उदा. पुरंदरचे राहणारे म्हणून पुरंदरकर तर शेळ्यांचे संगोपन करणारे ते शेळके अशी काही आडनावे पडली असल्याचे दिसते. रामोशी समाजात चव्हाण कुळ हे सर्वश्रेष्ठ मानले जाते. स्वभाविकच सण–समारंभाप्रसंगी किंवा तंटा–बखेडा सोडविण्याप्रसंगी चव्हाण कुळ असलेल्या व्यक्तींना सन्मान प्रदान केला जातो.[7]

## रामोशी लोकांचे राहणीमान :

महाराष्ट्रात पुणे आणि सातारा ही रामोशी समाजाची मुख्य वस्तीस्थळे मानली जातात. उंच, बांधेसूद व पीळदार शरीरप्रकृतीचे रामोशी लोक मराठी भाषिक आहेत. असे असले तरी त्यांच्या बोलण्यातून अधून–मधून कानडी भाषेतील शब्दांचा वापर होत असतो.[8] रामोशी समूहाला स्पृश्य मानले गेले असले तर जंगल सोडून आलेल्या या लोकांना गावांच्या मध्यवस्तीत स्थान मिळाले नाही. त्यांना वेशीजवळ (गावकुसाजवळ) स्थान देण्यात आले. कारण गावाचे रक्षण होईल असा हेतू सर्व सवर्णांचा होता.[9] रामोशी लोक डोक्याला लांब रूमाल गुंडाळत आणि अंगात लांब सदरा तर कमरेला कसून धोतर नेसत. दाढी–मिशा ठेवलेले रामोशी लोक आपल्या खांद्यावर फरशी कुऱ्हाड बाळगीत. पायात वजनदार जाड चपला वापरीत.[10] असे राहणीमान रामोशी समाजातील लोकांचे होते.

## रामोशी समूहाच्या कुलदेवता :

जेजुरीचा खंडोबा हे रामोशी लोकांचे कुलदैवत होते. म्हणून कोणत्याही शुभकार्याला प्रारंभ करताना हे लोक 'जयमल्हार' असा उद्‌घोष करीत. खंडोबा या कुलदेवतेच्या नावाने जागरण गोंधळ घालून पूजा बांधीत असतात. खंडोबा देवाच्या यात्रेत पालखी उचलण्याचा मान धनगर लोकांप्रमाणेच रामोशी लोकांनाही दिला जातो. हे लोक शपथ घेत असताना हातात भंडारा घेतात म्हणजेच खंडोबाचे नामस्मरण करून घेतलेली शपथ शेवटपर्यंत निष्ठेने पाळीत असत.[11] याचबरोबर कोंढणपूरच्या भवानी देवीचीही तेवढीच श्रद्धेने रामोशी लोक उपासना करीत असतात. या समाजाचे भूषण ठरलेल्या आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांनी आपल्या सहकार्यांमार्फत भांबुर्डे (पुणे) येथील ब्रिटीश खजिना हस्तगत केल्यानंतर त्यातील काही भाग कऱ्हे पठारावरील जेजुरीच्या खंडोबाला आणि कोंढणपुरच्या भवानी देवीला अर्पण केला होता.

## व्यवसाय :

मराठाकालीन महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेत गावाची जमीनजुमल्याची राखण करणारी 'जागला' किंवा तत्सम स्वतंत्र जात—जमात होती. परंतु हे काम आपल्या इमानदारीच्या बळावर रामोशी समाजाकडे आले होते. रामोशी समाजाचे इतर जाती—जमातीप्रमाणेच स्वतः रितीरिवाज, आचार—विचार, कुल व देवधर्म होते. रखवालदारीच्या मोबदल्यात रामोशी लोकांना बिनसाऱ्याची जमीन किंवा वार्षिक रक्कम दिली जाई.[12] तसेच गावात मुक्कामास असलेल्या प्रवाशांच्या गाड्या व साहित्याची सुरक्षितताही रामोशी रखवालदार करीत असत. या मोबदल्यातही त्यांना मोबदला मिळत असे. गावाची सुरक्षितता राखणाऱ्या रामोशी रखवालदारास नाईक, सरनाईक असे म्हणत. ग्रामव्यवस्थेत रामोशी रखवालदारास फार महत्त्वाचे स्थान होते.[13] याबरोबरच रामोशी लोक शेती, पशुपालन, पहरेदार, शिकार असे व्यवसायही करीत.

## रामोशी समाजाचे ऐतिहासिक योगदान :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात महाराष्ट्रातील सर्वच अठरापगड जाती—जमातींनी स्वराज्य उभारणीच्या महत्त्वाच्या कामी योगदान दिले होते. इस्लामविरोधी संघर्षात शिवाजी महाराजांनी दिलेल्या लढ्यांमध्ये शूरवीर रामोशी लोकांनी पराक्रम गाजविला. रामोशी लोक मुस्लिम शासकांच्या अखत्यारीतील प्रदेशावर हल्ले चढवून खंडणी वसूल करीत. मौल्यवान वस्तुंबरोबरच उंट, घोडे, हत्ती हस्तगत करीत. खोमणे या घराण्यातील वर्धोजी या रामोशी वीराने मोठा पराक्रम गाजविला. तसेच शिवाजी महाराजांनी रामोशी लढवय्या फौजेची तुकडी पुरंदरवर पाठवली होती. किल्ल्याच्या तटाला दोर बांधून रामोशी सैनिकांनी हल्ला चढविला होता. या मोहिमेत जरी अपयश आले असले तरी दुसऱ्या मोहिमेत गड घेण्यास यश मिळाले. रामोशी लोकांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात योगदान दिले असले तरी धामधुमीच्या काळात या शूरवीरांचा सन्मान महाराजांना करता आला नाही. शिवाजीमहाराजांच्या नंतरच्या म्हणजे छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातही तशीच परिस्थिती राहिल्याने रामोशीवीरांचा पुरस्कार देऊन सन्मान झाला नाही. मात्र संभाजी महाराजांचे पुत्र छत्रपती शाहू महाराजांनी या शूरवीरांचा दरबारी सन्मान केला. एवढेच नव्हे तर प्रत्येक 120 बीघा जमीन इनामही देण्यात आली होती. जंगल संपत्तीचाही अधिकार रामोशी लोकांना देण्यात आला. महत्त्वाचे म्हणजे पुरंदर किल्ल्याची किल्लेदारी देवून 75 हजार रुपये किल्ल्याचा वार्षिक खर्चही मंजूर केला होता.[14] तेव्हापासून खोमणे घराण्याची किल्लेदारी पुरंदरवर होती. याच घराण्यात रामोशी समाजाचे भूषण ठरलेले 'आद्यक्रांतिवीर' राजे उमाजी नाईक होवून गेले. त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध लढवय्या रामोशी लोकांचे संघटन करून ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला. ब्रिटिशांचे खजिने हस्तगत करून प्रतिशासनाची स्थापना केली. ब्रिटिश हे परकीय आहेत, त्यांनी आपला देश सोडून जाणे अनिवार्य आहे म्हणून आपल्या देशबांधवांना उद्देशून इतिहासप्रसिद्ध जाहीरनामा घोषित केला. त्यांना भुजाजी नाईकांसारखे अनेक लढवय्ये सहकारी मिळाले होते. त्यांनी जाहीरनाम्यातून दिलेल्या निर्देशानुसार जनक्रांती होऊन सहकार्य मिळाले नाही. ब्रिटिशांनी फंद—फितुरीच्या मार्गाचा अवलंब करून राजे उमाजी यांना कैद करून फाशी दिली. त्यांच्या हौतात्म्यातून या देशाच्या क्रांतीज्वाला अधिकाधिक तेजस्वी झाल्यात. रामोशी समाजाने या देशाला पहिला हुतात्मा आणि आद्यक्रांतिवीर द्यावा यातच या समाजाचे राष्ट्रीय योगदान किती महत्त्वाचे होते, याची प्रचिती येते.

## सारांश :

या देशातील रामोशी समूहाने मराठाकालीन समाजाच्या मालमत्ता, पीके, रहदारीच्या रस्त्यावरील जाणाऱ्या वाटसरू व त्यांच्या किंमती वस्तूंचे संरक्षण करून मोठे सामाजिक योगदान दिले आहे. रखवालदार म्हणून रामोशी समूहातील लोकांनी अतिशय प्रामाणिकपणे जबाबदारी पार पाडली आहे. असे असले तरी येथील सवर्ण समाजाने त्यांना गावगाड्यातील रचनेत गावात वसतीला स्थान देवून सामावून घेतले नाही. विशेष महत्त्वाचे म्हणजे या समाजातील शूरवीरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वात स्वराज्य उभारणीच्या महान कार्यातही मोठे योगदान दिले आहे. याचा मोबदला म्हणून त्यांना किल्लेदारी व ईनामी जमिनी देण्यात आल्या होत्या. अशी लढावू, प्रामाणिकपणा असणाऱ्या समाजात आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक होऊन गेलेत. त्यांनी आपल्या समाजाचे नेतृत्व करीत देशपातळीवर योगदान दिले. ही महाराष्ट्रीयन समाजाच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब राहिली आहे.

## संदर्भ :


1. जोशी तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री (संपा.) ***मराठी विश्वकोश, खंड–14,*** महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 1989, पृ. 199.
2. चव्हाण रामनाथ, ***जाती आणि जमाती***, मेहता पब्लिशिंग, पुणे, 1989, पृ. 114.
3. कित्ता, पृ. 115.
4. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री (संपा.), ***उपरोक्त क्र. 1,*** खंड–8, पृ. 199.
5. कालेलकर गोविंद मंगेश, ***मुंबई इलाख्यातील जाती,*** वरदा प्रकाशन, पुणे, 1928, पृ. 195.
6. चव्हाण रामनाथ, ***उपरोक्त क्र. 2,*** पृ. 116.
7. कॅप्टन मॅकिंटॉश, ***हिस्ट्री ऑफ द रामोशीज***, ज्युडिशियल डिपार्टमेंट, व्हॉल्युम–21/286, मुंबई आर्चिव्हज्, मुंबई, पृ. 9.
8. आत्रे त्रिंबक नारायण, ***गाव–गाडा***, वरदा बुक्स, पुणे, 1956 पृ. 92–93.
9. ***कित्ता,*** पृ. 4.
10. कदम नागनाथ, ***महाराष्ट्रातील भटका समाज***, संस्कृती व साहित्य, प्रतिभा प्रकाशन, पुणे, 1995, पृ. 94.
11. आठवले सदाशिव, ***उमाजी राजे, मुक्काम डोंगर,*** कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, 1991, पृ. 115–116.
12. कॅप्टन मॅकिन्टॉश, ***उपरोक्त क्र. 7,*** पृ. 16.
13. ***कित्ता,*** पृ. 21.
14. बैसाने डॉ. अनिल, पाटील डॉ. सुभाष (संपा.), ***पहिला हुतात्मा आणि आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची कागदपत्रे, खंड दुसरा***, सम्यक्ता प्रकाशन, धुळे, 2020, पृ. 45.





**प्रा. डॉ. संजीव सुकदेव पगारे**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे, ता. जि. धुळे.**